**MHGO070000472025**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय देवरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमान व्ही. एस. मेंढे)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २८/२०२५**
**सरकार विरुध्द पांडूरंग जांभूळकर**

**न्यायनिर्णय**
(दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी अधिघोषीत)

१. आरोपी पांडूरंग पुसाराम जांभूळकर हा अवैधरित्या दारू बाळगून विक्री करीत आहे, अशा आशयाची तक्रार पोलीस हवालदार रामराव लिंबाजी कांदे यांनी दिली. त्यानंतर पोलीस हवालदार ग्यानीराम करंजेकर यांनी प्रकरणाचा तपास करून कलम ६५(ई) व ७७–अ, अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

२. सदर कलम ११६ मुंबई दारूबंदी कायद्यानुसार संक्षिप्त स्वरूपाचे असल्यामुळे आरोपीला (नि.क्र.१०) अन्वये अपराधाचा तपशिल त्यांच्या मातृभाषेत समजावून सांगण्यात आला. त्यांनी गुन्हा नाकबुल केला. आरोपीचे कलम ३१३ फौ.प्र.सं. प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

३. अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेला पुरावा लक्षात घेवून सदर गुन्हा सिध्द करण्याकरीता निश्चीत केलेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह माझ्या विचारार्थ उपस्थित झाले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १८.०७.२०२४ रोजी ८.३० वाजताचे दरम्यान मौजा पंचशील चौक, देवरी, ता. देवरी, जि. गोंदिया येथे आरोपी त्यांच्या ताब्यात देशी दारुचे २८ नग दारु (प्रत्येकी ९० मिली.) विनापरवाना विक्री करण्याच्या हेतूने बाळगली, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ....नाही. |
| २. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे.. |

## कारणमीमांसा

**४.** आरोपी वरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकूण दोन पंच साक्षीदार धर्मराज उके (स.सा.क्र.१) व अनिल राउत (स.सा.क्र.२) यांना (नि.क्र.१०) खाली तपासले व त्यानंतर अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्रमांक १ खाली आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने</u> :**

**५.** पंच साक्षीदार धर्मराज (स.सा.क्र.१) व अनिल (स.सा.क्र.२) यांनी कथन केले की, पोलीसांनी त्यांना कोठेही पंचनाम्याकरीता बोलाविले नाही व त्यांच्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही तसेच काहीही जप्त केले नाही. दिनांक १८/०७/२०२४ रोजीचे सुचनापत्र व जप्ती पंचनामा त्यांना दाखविण्यात आले, त्यावर त्यांच्या सहया आहेत तथापि त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या सदर प्रकरणातील कथनाला दुजोरा दिलेला नाही, त्यामुळे त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले तथापि त्यांना विचारण्यात

आलेल्या सर्व उत्तर सूचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिलेले आहे.

६. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता, अभियोगपक्षाला खालील महत्वाच्या घटकांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर मुद्देमाल– दारू किंवा मादक द्रव्य पंचासमक्ष जप्त करण्यात आली.

२. दारू किंवा मादक द्रव्य बेकायदेशिररित्या आरोपीने बाळगले.

३. जप्त केलेला मुद्देमाल हा दारू आहे किंवा मादक द्रव्य आहे.

७. या प्रकरणात पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनाला दुजोरा दिलेला नाही. जप्त केलेला मुद्देमाल हे निश्चीतपणे दारू आहे असे सिध्द करणारा विधीग्राहय पुरावा म्हणजे रासायनिक विश्लेषण अहवाल या प्रकरणात अभियोजन पक्षातर्फे दाखल करण्यात आलेला आहे तथापि ते सिध्द करणारा कोणताही साक्षीदार तपासला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा सिध्द करणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

८. वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, आरोपीविरूध्द अपराध सिध्द करण्याकरीता वर उल्लेखीत महत्वाचे घटकापैकी एकही घटक अभियोग पक्षाला संशयापलीकडे सिध्द करता आले नाही. अशा परिस्थीतीमध्ये आरोपीने वर उल्लेखीत गुन्हा केला किंवा नाही, याबाबत संशय निर्माण होतो व या संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायोचित ठरते. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.२ च्या अनुषंगाने</u> :**

९. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षानुसार मी या निर्णयावर पोहोचलो की, आरोपी विरूध्द असलेले सदर प्रकरण खारीज होवून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

जप्त मुददेमाल २८ नग देशी दारुच्या बॉटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, गोंदिया यांचेकडे योग्य कार्यवाहीकरीता सादर करणे उचीत ठरेल. सबब मुद्दा क्र. २ चे उत्तराकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) आरोपी **पांडूरंग पुसाराम जांभूळकर** यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये मुंबई दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) व ७७–अ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीची जुनी जमानत अपीलकामी पुढील सहा महिन्यांसाठी पूर्ववत ठेवण्यात येते.

३) अपील कालावधी नंतर जप्त मुद्देमाल २८ देशी दारूच्या बाटल्या (प्रत्येकी ९०मिली.),राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांचेकडे पुढील कायदेशीर विल्हेवाटी करीता सादर कराव्या.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

VINAY SAHADEO MENDHE

Digitally signed by VINAY SAHADEO MENDHE
Date: 2026.03.20 12:17:31 +0530

दिनांक – १८/०३/२०२६

**(व्ही. एस. मेंढे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
देवरी

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | संजीवन वामन मळामे , |
| न्यायालयाचे नाव | : | श्रीमान व्ही. एस. मेंढे,<br>न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, देवरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १८/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १८/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १८/०३/२०२६ |